# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४**

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ५९, रूपये:- २३,८०,००,०००/-**<br>**श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (१) | ६५६३ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यातमध्ये २९६ मराठी शाळा, १२९ कन्नड शाळा व ८ उर्दु शाळा असून बहुतांश ठिकाणी शाळा खोल्या पुर्णपणे निकामी (खराब) झाल्या असून त्या धोकादायक बनल्या आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना धोका पोचू शकतो तरी जत तालुक्यातील नविन शाळा खोल्यांना तसेच दुरुस्ती साठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ६०, रूपये:- २,००,००,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (२) | ६५२५ | १० | शासनाने शिक्षक भरती सुलभरित्या करण्यासाठी पवित्र पोर्टल ची स्थापना करणे, या पवित्र पोर्टल मधून घेण्यात येणाऱ्या शिक्षक भरती साठी टीईटी अथवा सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेले अधिकृत नोंदणी असलेले शिक्षक असणे, नोव्हेंबर २०२३ पासून सर्व माध्यमासाठी शिक्षक भरतीची पहिली प्रक्रिया ऑनलाईन सुरु होणे, परंतु या भरती प्रक्रीयेमध्ये उर्दू माध्यमाच्या शाळेत इतर माध्यमाच्या उमेदवारांची निवड होत असल्याचे निदर्शनास येणे, या निवड प्रक्रियेमध्ये पारदर्शीपणा आणण्यासाठी इतर प्रवर्गातून शिक्षक उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील शिक्षकांना संधी मिळावी अशी मागणी पुढे येणे. शिक्षण सेवक पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक आर्हता नुसार उमेदवाराने ज्या माध्यमासाठी अर्ज केला असेल त्याला त्याच माध्यमासाठी पदावर नियुक्ती मिळणे अपेक्षित असताना उर्दू माध्यम न निवडलेल्या उमेदवारांची नियुक्ती होत असल्याचे निदर्शनास येणे, मातृभाषेतून शिक्षण मिळावे असे शिक्षणाचा अधिकार-२००९ कायद्यानुसार असताना देखील उर्दू माध्यमासाठी इतर भाषिक शिक्षकांची होणारी भरती हि उर्दू भाषिक शिक्षकावर होणारा अन्याय असणे, त्यामुळे उर्दू भाषिक शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असणे, परिणामी उर्दू भाषिक शिक्षकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३) | ६५२६ | १० | राज्यात एकूण ६६१ शाळा अनधिकृत असल्याची माहिती काही महिन्यापुर्वी समोर येणे, कारवाईनंतर ही अदयाप ३७८ शाळा बेधडक सुरु असणे, मुंबई महापालिका परिक्षेत्रातील एकूण १८६ अनधिकृत शाळांपैकी केवळ हाताच्या बोटयांवर मोजण्याइतक्या शाळा बंद करण्यात येणे, अनधिकृत शाळांचा प्रश्न केवळ ठराविक शहरापूरता मार्यादित नसून राज्यव्यापी होणे, शिक्षण विभागाची परवानगी न घेता शाळा सुरु करणे, दुस-या शाळांच्या यूआयडी क्रमांकावर विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम भासवून केंद्रीय शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम शिकवणे, जादा दराने शुल्क आकारणे,शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणे, शाळांमध्ये गणवेश-शैक्षणिक साहित्य विकणे, संस्थाचालकांची मनमानी कारभार सर्रासपणे सुरु असल्याने विद्यार्थी आणि पालकांची फसवणूक होत असणे, संबंधित शाळांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०४, क्रिडा व युवकसेवा**<br>**बाब क्रमांक: ६४, रूपये:- १,१९,६७,००,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (४) | ६५५२ | १० | अमरावती जिल्हयातील तालुका क्रीडा अधिकारी पद तात्काळ भरणे १४ तालुके असतांना केवळ एक तालुका क्रीडा अधिकारी कार्यरत असणे, जिल्हा वार्षिक योजनेतून दरवर्षी ५० प्रस्ताव मंजूर असणे त्याकरीता ३ कोटी निधी व्यायाम शाळेकरिता मंजूर होत असणे, प्रत्यक्षात प्रस्ताव दरवर्षी १०० च्यावर प्राप्त होतात त्यामध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी केली असणे, व्यायाम शाळा बांधकाम ७ लक्ष एवढीच मर्यादा असणे, ७ लक्ष मधून ५०० स्वेअर फूट बांधकाम होऊ शकत नाही त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती यावरील मांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ६६, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (५) | ६५२९ | १० | सेंट्रल इंग्लिश स्कूल, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग या शाळेने शिक्षणाधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये १००० रुपये फी वाढ केली असणे, तसेच सन २०११-२०१२ या वर्षानंतर मुख्यध्यापकानी शासनाकडून मान्यता (Approval) घेतली नसणे, गत १२ वर्षापासून मुख्याध्यापकाची मान्यता न घेता शाळा चालविली जात असणे, ही बाब गंभीर असणे, १,००० रुपये फी वाढ करणे व मुख्याध्यापकीची शासन मान्यता न घेतल्यामुळे विद्यार्थी पालक व स्थानिक रहिवाशांमध्ये असंतोष निर्माण झाला असणे, परिणामी त्या शाळेवर प्रशासक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नेमण्याची मागणी प्रधान सचिव, शिक्षण विभाग व शिक्षणाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे केली असणे, शाळेवर प्रशासक नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई